# // प्रेसनोट //

**२८ जून पल्स पोलिओ लसीकरण मोहिम**

पोलिओ निर्मूलनासाठी येत्या रविवारी (दि. २८ जून २०२६) राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका वैद्यकीय विभागामार्फत सर्व तयारी करण्यात आली आहे. शहरात ३९६ लसीकरण केंद्रांची स्थापना करण्यात आली असून सुमारे १०३० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या मोहिमेंतर्गत २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शहरातील विविध पोलिओ बूथवर बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्यात येणार आहेत. त्यानंतर २९ जून ते ३ जुलै २०२६ या कालावधीत आरोग्य कर्मचारी घरभेटी देऊन राहिलेल्या बालकांचे लसीकरण करणार आहेत. शहरातील ५ वर्षांखालील सर्व बालकांपर्यंत लसीकरण सेवा पोहोचविण्यासाठी महापालिकेमार्फत एकूण ३९६ लसीकरण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये महानगरपालिका दवाखाने, रुग्णालये, मोठी खासगी रुग्णालये आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये 396 स्थायी लसीकरण केंद्रे उभारण्यात आली आहेत. तसेच बस स्थानके, रेल्वे स्थानकांवर 60 ट्रान्झिट लसीकरण केंद्रे, तर बांधकामे आणि स्थलांतरित कुटुंबांच्या वस्त्यांमध्ये 14 फिरती लसीकरण केंद्रे कार्यरत राहणार आहेत. मोहिमेसाठी 3 मुख्यालयातील वैद्यकीय अधिकारी, 15 वैद्यकीय अधिकारी, 88 पर्यवेक्षक आणि 1030 लसीकरण कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच, इतर आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवकांनाही मोहिमेत सहभागी करून घेण्यात येत आहे. सन्मा. महापौर श्रीम. डिंपल विनोद मेहता व मा.आयुक्त श्री.राधाबिनोद शर्मा यांनी 0 ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पालकांनी पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन केले आहे.

(डॉ.नंदकिशोर लहाने)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

24000